# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.11.2024** **वार – सोमवार**

---

**प्रचार**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपला. अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांच्या उमेदवारांनी प्रचार सभा, प्रचार फेरी, दुचाकी फेरी, कोपरा सभा आणि प्रत्यक्ष संपर्क साधत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूर आणि बारामतीमध्ये जाहीर सभा घेतली. प्रामाणिक कामाला आणि विकासाला मत द्या, असं आवाहन अजित पवार यांनी केलं. भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दौंड इथं प्रचार सभा घेतली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रचाराच्या अखेरच्या दिवशी आज भोर आणि बारामतीमध्ये जाहीर सभा घेतली. बारामतीमधल्या आपल्या सांगतेच्या प्रचार सभेत शरद पवार यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. कोथरूड विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत मोकाटे यांनी आज प्रचार फेरी काढली; निवडून आल्यावर बालेवाडी परिसरात 800 खटांचं सुसज्ज रुग्णालय उभारण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. पर्वती मतदारसंघात महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार अश्विनी कदम यांनी गुलटेकडी मार्केट यार्ड परिसरातील व्यापाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कॉंग्रेसचे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पत्रकार परिषद घेत कर्नाटक, तेलंगण आणि हिमाचल प्रदेश इथल्या कॉंग्रेस सरकारने दिलेली आश्वासनं खरी करून दाखवली, असं सांगितलं.

केंद्रीय पर्यटन मंत्री आणि भाजपा नेते गजेंद्रसिंग शेखावत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेतली. पुण्यातील ऐतिहासिक वारसा, देशातील पर्यटन केंद्राशी जोडला जाईल. राज्यातील 11 किल्ले जागतिक वारसा स्थळ होण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. पुण्यातील शिवसृष्टी प्रकल्पालाही राज्य सरकारने मदत केली असून पर्यटनाच्या दृष्टीने पुणे आगामी काळात अधिक वेगाने विकसित करण्यात येईल, असं शेखावत यांनी सांगितलं. स्वातंत्र्य मिळाल्यापासून कॉंग्रेसने देशात फूट पाडा आणि राज्य करा या तत्त्वानुसार काम केलं आहे, असा आरोप शेखावत यांनी केला.

**निवडणूक तयारी**

दरम्यान, येत्या बुधवारी, 20 तारखेला होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदार यादीत नाव असल्यास, मतदार ओळखपत्र किंवा भारत निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या 12 पुराव्यापैकी एक दाखवून मतदान करता येईल, मतदार यादीत नाव नसेल तर संबंधित व्यक्तीला मतदान करता येणार नाही; असं जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केलं आहे. मतदार यादीत नाव नसल्यास नमुना क्रमांक 17चा अर्ज

भरून आणि आपलं मतदार ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार असल्याचा दिशाभूल करणारा संदेश व्हॉट्सअपद्वारे पसरवला जात आहे. असे निवडणूक प्रक्रियेविषयीचे चुकीचे संदेश, अफवा पसरवल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिला आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी 5 अशा एकंदर 15 मतदान केंद्रांवर महापालिकेच्या वतीने 'हरित मतदान केंद्र' ही संकल्पना राबवण्यात येत आहे. या मतदान केंद्रांवर खास मतदारांसाठी विविध पाम प्रजाती, शोभिवंत झाडे, फळझाडे, आयुर्वेदिक औषधी वनस्पती अशा विविध वनस्पतींची माहिती देणारं प्रदर्शन भरविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणा तसंच विविध संस्था संघटना देखील अनेक उपक्रम राबवत आहेत. महिलांचा मतदानातील टक्का वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पाचपेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी पाळणाघर तयार करण्याचं नियोजन केलं आहे. दोन हजारपेक्षा जास्त ठिकाणी ही पाळणाघरं असतील. त्यामध्ये पिण्याचं पाणी, खेळण्यांबरोबरच बाळाला आवश्यकतेनुसार पोषक आहारदेखील उपलब्ध असेल. लघु उद्योजकांच्या 'घे भरारी' समूहातर्फे 'घे भरारी, करू मतदान भारी' हे मतदान जागृती अभियान राबविण्यात आलं. मतदान करून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला घे भरारीच्या केंद्रांवर सकाळी 11 वाजेपर्यंत मोफत चहापान आणि नाश्ताही दिला जाणार आहे.

**<u>वाहतूक बदल</u>**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या स्वारगेट भागातील वाहतूक व्यवस्थेत उद्या आणि परवा बदल करण्यात येणार आहे. गणेश कला क्रीडा मंच परिसरातील मतदान केंद्रातून मतपेट्या, तसंच अन्य साहित्य पीएमपील बसने वितरित करण्यात येणार असल्याने या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.

**<u>क्रीडा</u>**

महाराष्ट्र राज्य प्रौढ टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने प्रौढांची राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा पुण्यात पार पडली. यात पुण्याच्या अजय कोठावळे यांनी 59 वर्षावरील गटात विजेतेपद पटकावलं. 79 वर्षांवरील पुरुष गटात पुण्याचे सुबोध देशपांडे तर 69 वर्षांवरील महिला गटात मनीषा बोडस यांनी विजेतेपदावर आपली मोहर उमटवली. या स्पर्धेत राज्यभरातील जवळपास साडेतीनशे खेळाडू सहभागी झाले होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश मुख्यतः निरभ्र असेल; किमान तापमान 15 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**